जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-४/कंत्राटीसेवा/२०१९/
दिनांक :

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे पत्र क्र. १५/तंशिसं/अर्थसं/२०१९-२०/१२, दिनांक १४/०५/२०१९ चे अवलोकन करण्यात यावे. त्यामध्ये सूचित केल्यानुसार बाह्य यंत्रणेमार्फत सुरक्षा रक्षक, सफाईगार, व माळी इत्यादी वर्ग (४) पदांच्या सेवा कंत्राटीपद्धतीने उपलब्ध करुन घेणे कामी नमूद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

प्र.सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र सहपत्रांसह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-४/कंत्राटी/२०१६/2164
दिनांक :

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख.

त्यांना कळविण्यात येते की, संदर्भित पत्रामध्ये सूचित केल्यानुसार कंत्राटी सेवा नोंदणीकृत एजन्सी मार्फत घेण्यासंदर्भात दिलेल्या सूचनांचे पालन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र सहपत्रांसह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

E Mail-desk१५@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : १५/तंशिसं/अर्थसं/२०१९-२०/१२

दिनांक 14 MAY 2019

प्रति,

१) संचालक/प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

२) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.

विषय :- बाहय यंत्रणेमार्फत सुरक्षा रक्षक, सफाईगार व माळी इत्यादी (वर्ग-४) पदांच्या सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत.

संदर्भ :-१) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१०/८४/१०/विसु-१, दि.२७/०९/२०१०.

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि.०२/०२/२०१३.

३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारण-१, दि.०२/१२/२०१३.

४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारण-१, दि.१९/१२/२०१३.

५) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.२९/१६/वित्तीय-१, दि.०२/०८/२०१६.

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये प्रशासनावरील खर्च कमी करुन विकास कामासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी नियमित पदनिर्मिती न करता बाहेरुन करुन घेता येतील अशी कामे बाहय यंत्रणेकडुन करुन घेण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र. २,३ व ४ च्या परिपत्रकान्वये मंजूर पदांच्या प्रमाणात शासनाने विहित केलेल्या पध्दतीने निविदा प्रक्रिया पार पाडून अत्यंत पारदर्शक पध्दतीने सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने नियमितपणे पदनिर्मिती करुन केलेल्या खर्चाच्या १० ते २५ टक्के इतकी बचत होईल अशा रितीने बाहय यंत्रणेद्वारे कामे करुन घेण्याच्या सुचना आहेत.

उपरोक्त शासन परिपत्रकातील सूचनाचे पालन न करता थेट पध्दतीने व सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरीशिवाय बाहय यंत्रणेच्या सेवा घेतल्यामुळे कोषागार कार्यालयाकडुन आक्षेप लावून देयके परत केली जातात. विहित पध्दतीने सेवा न घेतल्यामुळे खर्चास प्रशासनिक विभागाची मंजुरी प्राप्त करणे शक्य होत नाही. प्रशासनिक विभागाच्या मंजूरीशिवाय खर्च केल्यास महालेखापाल कार्यालयाकडुन लेखापरिक्षनामध्ये

पुणे.
27 MAY
आवक क्र. 5083

परिच्छेद उपस्थित होऊ शकतात. कंत्राटदारास खर्चाची रक्कम विहित वेळेत प्राप्त न झाल्यामुळे संचालनालय व शासनाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उदभवू शकतात.

सबब उपरोक्त बाबीचा विचार करता या संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालय/संस्थामध्ये बाहय यंत्रणेच्या सेवा उपलब्ध करुन घेणे कामी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१. संदर्भ क्रमांक १,२,३ व ४ या परिपत्रकातील तरतूदींचे, तसेच या आदेशात वेळोवेळी केलेल्या सुधारणा/तरतूदींचे काटेकोरपने पालन करण्यात यावे.
२. संदर्भाकींत वित्त विभागाच्या परिपत्रकातील सुचनाचे पालन न करता थेट पध्दतीने बाहय यंत्रणेच्या घेण्यात आलेल्या सेवा रद्द करुन, शासनाने विहित केलेल्या निविदा प्रक्रियाद्वारे बाहय यंत्रणेच्या सेवा मंजूर रिक्त पदांच्या मर्यादित उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.
३. कार्यालय/संस्था यांच्याकडील वर्ग-४ च्या मंजूर पदामधील रिक्त पदाकरीता वित्त विभागाकडुन कंत्राटी सेवाकरीता अनुदान मंजूर करण्यात येते, त्यामुळे रिक्त पदांपेक्षा बाहययंत्रणेमार्फत भरलेल्या पदांची संख्या जादा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
४. शासनाने विहित केलेल्या निविदा प्रक्रियाद्वारे बाहय यंत्रणेच्या सेवा प्राप्त केल्यानंतर बाहय यंत्रणेकडुन केलेल्या किंवा करण्यात येणाऱ्या खर्चास या संचालनालयातील कार्यासन क्रमांक १२ मार्फत प्रस्ताव सादर करुन उच्च व तंत्रशिक्षण या प्रशासनिक विभागाची मंजूरी घेण्यात यावी.
५. नियमीतपणे पदनिर्मिती करुन केलेल्या खर्चाच्या १० ते २५ टक्के बचत होईल याची दक्षता संस्थाप्रमुखानी घ्यावी.
६. बाहय यंत्रणेच्या सेवेकरीता होणारा खर्च हा कमीतकमी प्रमाणात राहील याची जबाबदारी संबंधीत संस्थाप्रमुख व सहसंचालक यांची राहील.

सदरहू परिपत्रकांतील सुचनांचे पालन न करणाऱ्या संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावीत करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे याची संस्थाप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, मुंबई/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना सुचित करण्यात येते की, आपल्या विभागाती संस्था/कार्यालयामध्ये बाहय यंत्रणेच्या सेवा उपलब्ध करुन घेणे कामी उपरोक्त सुचना/कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत आल्या स्तरावरुन संबंधीतांना सुचना देण्यात याव्यात.